लोकमत

**सामाजिक जबाबदारी : कोरोनामुक्तीसाठी जनजागृती उपक्रम**

# महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी केले आरोग्य सर्वेक्षण

**मुकुंद बाविस्कर** ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाअंतर्गत कर्मवीर वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक कोरोनामुक्तीसाठी आरोग्य सर्वेक्षण करीत जनजागृती उपक्रम राबवित आहे. गेल्या दोन महिन्यांपासून हा उपक्रम सुरु आहे.

कोरोना जनजागृतीसाठी १६ डिजिटल पोस्टर्स व १२ व्हिडिओज स्वयंसेवकांनी बनविले आहे. कोरोना रोखण्यासाठीचे उपाय, कोरोना योद्धांचे योगदान, कोरोना लढ्यात




आपली सामाजिक जबाबदारी आदी विषयांवर सदर डिजिटल पोस्टर्स व व्हिडिओज आहे. हे सर्व सोशल मीडियावर जनजागृतीसाठी शेअर करण्यात आले आहे. या महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे २५० स्वयंसेवकांचे युनिट असून, या स्वयंसेवकांनी आतापर्यंत सुमारे १२०० गरजू कुटुंबांचे आरोग्य सर्वेक्षण केले आहे. या सर्वेक्षणात कुटुंबाचे राहण्याचे ठिकाण, कुटुंबातील एकूण व्यक्ती, बालके, वयस्कर व्यक्ती, मिळणाऱ्या सुविधा, मास्क व सॅनिटायझरचा वापर आदी बाबींचा समावेश आहे. त्याचबरोबर महाविद्यालयातील सर्व स्वयंसेवकांची रक्तदाता सूची तयार करण्यात आली आहे. यात प्रत्येकाचे सध्याचे ठिकाण, ब्लडग्रुप, मोबाइल नंबर, ई-मेल, रक्तदानाची तयारी या बाबींचा समावेश आहे. यातील बहुतेक स्वयंसेवकांनी रक्तदानाची तयारी दाखविली आहे.

> “ माझ्यासाठी नव्हे तर तुमच्यासाठी हे राष्ट्रीय सेवा योजनेचे ब्रीदवाक्य महाविद्यालयाचे स्वयंसेवक आज खऱ्या अर्थाने सार्थ ठरवत आहेत. कोरोनासारख्या महाकाय संकटात ते सामाजिक कार्यात हिरीरीने सहभाग घेत आहेत. माणसाला, माणसाकडे, माणूस म्हणून बघण्याचा संदेश आपल्या कृतीतून स्वयंसेवक देत आहेत, याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटत आहे.
>
> **- प्रा. स्वानंद डोंगरे,**
> कार्यक्रम अधिकारी, वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय

महाविद्यालयातील जवळपास १३० स्वयंसेवकांनी मास्क तयार केले आहे. आतापर्यंत सुमारे ११५० मास्क स्वयंसेवकांनी तयार करून ते दत्तक कुटुंब व मजूर यांना वितरित केले आहे. यासोबतच स्वयंसेवकांना कोरोनाच्या लढ्यातील आपली जबाबदारी समजून या लढ्यासाठी त्यांना उद्युक्त करण्यासाठी सामाजिक क्षेत्रातील विविध मान्यवरांचे वेबिनार त्यांच्यासाठी प्रत्येक आठवड्यात आयोजित करण्यात येत आहे. या उपक्र मासाठी स्वयंसेवकांना संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. स्वानंद डोंगरे मार्गदर्शन करत आहेत.

Hello Nashik
Page No. 1 Jun 05, 2020
Powered by: erelego.com